**<u>ठळक बातम्या</u>**

- माजी प्रधानमंत्री, डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांसह जगभरातून शोक व्यक्त / देशात ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर / उद्या अंत्यसंसकार

- जर्मनीमधे मुदतपूर्व निवडणुकीचा मार्ग मोकळा करण्यासाठी राष्ट्रपतींकडून संसदेचं कनिष्ठ सभागृह विसर्जित

- बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या ४७४ धावा, भारताची फलंदाजी ढेपाळली

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, तिसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजवर पाच गडी राखून मात करत भारताचा ३-० असा मालिका विजय

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. डॉ सिंग हे शैक्षणिक आणि प्रशासकीय अशा दोन्ही विश्वात आपला ठसा उमटवणाऱ्या दुर्मिळ राजकारण्यांपैकी एक होते, असं राष्ट्रपतींनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. तर डॉ. मनमोहन सिंग हे भारताच्या आर्थिक परिप्रेक्ष्यात परिवर्तन घडवणारे असामान्य अर्थतज्ञ होते, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी

भारताच्या आर्थिक धोरणावर मजबूत ठसा उमटवल्याचं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं. ते म्हणाले...

**होल्ड - बाईट - प्रधानमंत्री**

डॉ. सिंग यांनी आपल्या प्रधानमंत्री पदाच्या कार्यकाळात सर्वसामान्य नागरिकांचं जीवन सुधारण्यासाठी केलेल्या व्यापक प्रयत्नांची मोदी यांनी प्रशंसा केली.

डॉ.मनमोहन सिंग यांनी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर ते अर्थमंत्री आणि प्रधानमंत्री म्हणून देशाच्या कारभारात महत्त्वाची भूमिका बजावल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. डॉ. सिंग यांच्या नेतृत्वानं पक्षाच्या कक्षा ओलांडून प्रशंसा आणि आदर मिळवला असून, त्यांचा वारसा पिढ्यानपिढ्या राष्ट्र उभारणीसाठी प्रेरणा देत राहील, असं भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा यांनी म्हटलं आहे. डॉ.सिंग यांचं नेतृत्व, नम्रता आणि समर्पण सदैव स्मरणात राहील, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे.

भारतानं एक दूरदर्शी राजकारणी, अभेद्य एकतेचा नेता आणि अतुलनीय उंचीचा अर्थतज्ज्ञ गमावल्याचं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी असामान्य शहाणपण आणि सचोटीनं भारताचं नेतृत्व केलं. त्यांची नम्रता आणि अर्थशास्त्राची सखोल जाण यामुळे देशाला प्रेरणा मिळाली, असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी शोक व्यक्त केला आहे. भारताचे अर्थमंत्री म्हणून सर्वात

आव्हानात्मक काळात त्यांनी देशाला आर्थिक संकटातून यशस्वीपणे पुढे नेलं आणि जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा पाया घातला, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनीही मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

डॉ. मनमोहन सिंग यांचं काल नवी दिल्ली इथं वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. काल संध्याकाळी प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्यांना नवी दिल्लीतल्या एम्स रुग्णालयात दाखल केलं होतं. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर नवी दिल्ली इथं संपूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल सरकारनं ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नवी दिल्ली इथल्या निवासस्थानी आज नागरिकांना त्यांच्या पार्थिवाचं दर्शन घेता येईल. उद्या सकाळी काँग्रेस मुख्यालयात त्यांचं पार्थिव आणलं जाईल, आणि त्यानंतर सकाळी साडे नऊ वाजता काँग्रेस मुख्यालयातून डॉ. मनमोहन सिंग यांची  अंत्ययात्रा निघेल, अशी माहिती काँग्रेसचे सरचिटणीस के.  सी.  वेणुगोपाल यांनी समाजमाध्यमावर दिली.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल जागतिक नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. आर्थिक प्रगती आणि मुत्सद्देगिरीमध्ये त्यांनी दिलेल्या असामान्य  योगदानाचं स्मरण करून त्यांनी आदरांजली वाहिली आहे.

**अमेरिकेचे** परराष्ट्र मंत्री अँटोनी ब्लिंकन यांनी भारत-अमेरिका संबंधांचे एक महत्त्वाचे शिल्पकार म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांचं स्मरण केलं असून, दोन्ही देशांमधल्या धोरणात्मक भागीदारीतल्या महान नेत्यांपैकी एक असल्याचं म्हटलं आहे.

**ब्राझीलचे** राष्ट्राध्यक्ष लुला द सिल्वा यांनी भारत, ब्राझील, दक्षिण आफ्रिका संवाद मंच आणि ब्रिक्स गट स्थापन करण्यात मनमोहन सिंग यांनी दिलेल्या योगदानाचं स्मरण केलं आहे.

**अफगाणिस्तानचे** माजी राष्ट्राध्यक्ष हमीद करझाई यांनी सोशल मीडियावर म्हटलं आहे की, भारतानं आपला एक गुणवान पुत्र गमावला आहे. डॉ. सिंग अफगाणिस्तानच्या जनतेचे दृढ मित्र होते, असं त्यांनी म्हटलं आहे.

डॉ मनमोहन सिंग हे **मालदीवचे** दयाळू पिता आणि प्रिय मित्र होते, असं मालदीवचे माजी राष्ट्राध्यक्ष मोहम्मद नशीद यांनी म्हटलं आहे.

भारतातले **रशियाचे** राजदूत डेनिस अलीपोव्ह यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे की, भारत-रशिया द्विपक्षीय संबंधांमध्ये डॉ.मनमोहन सिंग यांचं योगदान अतुलनीय असून, भारत आणि रशियासाठी हा अत्यंत दुःखाचा क्षण आहे.

डॉ. मनमोहन सिंग हे एक दूरदर्शी नेते आणि सच्चे राजकारणी होते, भारताच्या विकासात आणि जागतिक मुत्सद्देगिरीमधलं त्यांचं योगदान सदैव स्मरणात राहील, असं **नेपाळचे** परराष्ट्र मंत्री डॉ. अर्जू राणा देउबा यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

**फिनलंड, कोरिया आणि नॉर्वे**च्या भारतातल्या राजदूतांनीही समाज माध्यमावर संदेशाद्वारे डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं आज माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे देशानं एक प्रख्यात राजकारणी, ख्यातनाम अर्थतज्ञ आणि प्रतिष्ठित नेता गमावला असल्याची भावना मंत्रिमंडळानं व्यक्त केली आहे.

संसदेतही शोक प्रस्ताव पारित करुन, तसंच दोन मिनिटांचं मौन पाळून मनमोहन सिंग यांना आदरांजली वाहण्यात आली. डॉ. मनमोहनसिंग यांनी देशावर आपली छाप सोडल्याचं यात म्हटलं आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी १९९१ ते १९९६ या काळात भारताचे अर्थमंत्री म्हणून देशात आर्थिक सुधारणांचं सर्वसमावेशक धोरण राबवण्यात महत्वाची भूमिका बजावली, असं या शोक प्रस्तावात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जर्मनीमधे मुदतपूर्व निवडणुकीचा मार्ग मोकळा करण्यासाठी राष्ट्रपती फ्रँक-वॉल्टर स्टेनमिअर यांनी आज संसदेचं कनिष्ठ सभागृह विसर्जित केलं. प्रधानमंत्री ओलाफ स्कोल्झ यांचं सरकार कोसळ्यामुळे येत्या २३ फेब्रुवारीला ही निवडणुक होणार आहे. नवं सरकार स्थापन होईपर्यंत ओलाफ स्कोल्झ काळजीवाहू सरकारचे प्रमुख म्हणून काम करतील.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियात मेलबर्न इथं सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्याच्या आज दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ४७४ धावांवर संपला. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजी ढेपाळली. विराट कोहली आणि के एल राहुल हे दोघं अनुक्रमे ३६ आणि २४ धावांवर बाद झाले. रोहित शर्मा अवघ्या तीन धावा करू शकला तर आकाशदीप शून्यावर बाद झाला. सलामीवीर यशस्वी जयस्वालच्या ८२ धावांमुळे आज दिवसअखेर भारताच्या पाच बाद १६४ धावा झाल्या.

माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी भारतीय संघाचे खेळाडू दंडावर काळ्या फिती बांधून खेळत होते.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे, भारतानं वेस्ट इंडिजविरुद्धची एकदिवसीय मालिका ३-० अशी जिंकली आहे. वडोदरा इथं आज झालेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या एकदिवसीय सामन्यात भारतानं वेस्ट इंडिजवर पाच गडी राखून विजय मिळवला. वेस्ट इंडिजनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र त्यांचा संघ ३८ षटकात १६२ धावांमधे गारद झाला. भारतानं अवघ्या २८ षटकांत १६७ धावा करत विजयी लक्ष्य पार केलं.

भारताच्या विजयात दिप्ती शर्माच्या भेदक गोलंदाजीचा मोठा वाटा आहे. दिप्तीनं ३१ धावांच्या बदल्यात सहा गडी बाद केले. ती सामनावीर, तर रेणुका सिंह ठाकूर हिला मालिकावीर ठरली. आंतरराष्ट्रीय महिला

क्रिकेटमध्ये, दोनवेळा सहा गडी बाद करणारी दिप्ती शर्मा पहिली भारतीय गोलंदाज ठरली..

**<><><><><>**

वायव्य आणि मध्य भारताच्या काही भागात आज मेघगर्जनेसह वादळी वारे आणि गारपिटीचा अंदाज असून, हवामान विभागानं या भागाला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><><>//**